# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०५ जुलै, २०२४ / आषाढ १४, १९४६ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(७)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

---

## शिक्षणाधिकारी (माध्यमिक) चंद्रपूर यांच्या कामकाजातील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(१) * २३४५४ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २२१६२ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) चंद्रपूर यांच्या कार्यालयात शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्या तपासणी पथकाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयाच्या तपासणीत वरिष्ठ / निवड श्रेणी, वैद्यकीय प्रकरणे, सेवानिवृत्ती प्रकरणे व इतर अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तपासणी पथकाच्या अहवालाच्या अनुषंगाने त्रुटीपूर्तता अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक), चंद्रपूर यांनी शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कार्यालयाच्या केलेल्या तपासणीत वरिष्ठ / निवड श्रेणी, वैद्यकीय प्रकरणे, सेवानिवृत्ती प्रकरणे व इतर अनेक प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या तत्कालिन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व शिक्षण विभागातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत तपासणी समितीने शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.चंद्रपूर या कार्यालयाच्या दिनांक २८/०८/२०२३ रोजी केलेल्या तपासणीमध्ये शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांची वरिष्ठ/निवड श्रेणी, वैद्यकीय प्रकरणे, सेवानिवृत्ती प्रकरणे व इतर अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे निर्दशनास आले आहे.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे स्तरावरून शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.चंद्रपुर यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील तूर बाजारभावाने खरेदी करण्याबाबत

**(२) * २३३९८ श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाबार्डमार्फत बाजारभावाने तूर खरेदीची घोषणा केंद्र शासनाने केली असून त्याची अद्यापही अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तूर खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांकडील तूर त्यांच्याजवळ पडून असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, तसेच नव्याने तूर पेरणी कमी होण्याची भिती व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने तूर खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हंगाम २०२३-२४ मधील केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात नाफेडच्या वतीने पणन महासंघामार्फत तूर खरेदीकरीता दिनांक २८/०३/२०२४ पासून शेतकरी नोंदणी सुरु करण्यात आली. मात्र तूरीचे बाजारभाव आधारभूत दरापेक्षा जास्त असल्यामुळे तूर खरेदी झालेली नाही. त्याचप्रमाणे केंद्र शासनाने राज्यात पी.एस.एफ योजनेंतर्गत बाजार भावाने तूर खरेदी करण्याबाबत दिलेल्या सूचनेनुसार तूर खरेदी करण्यात येत आहे. परंतु सदर खरेदीस देखील शेतकऱ्यांमार्फत प्रतिसाद मिळाला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## रांजणगाव आणि आमदाबाद (ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील महाविद्यालयांच्या प्रश्नपत्रिका परिक्षेपूर्वीच संस्थाचालकांच्या मोबाईलवर पाठविण्यात येत असल्याबाबत

**(३) * २३२०६ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुरुकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रांजणगाव व आमदाबाद येथील पद्मावती कला महाविद्यालयात (ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर) या महाविद्यालयांच्या केंद्रातील स्ट्रॉंग रुममधून परिक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका संस्थाचालकांच्या मोबाईलवर पाठविण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महाविद्यालयांच्या केंद्रातील स्ट्रॉंग रुममधून परिक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका संस्थाचालकांच्या मोबाईलवर पाठविणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच दोन्ही महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर अंतर्गत मार्च/ एप्रिल, २०२४ मध्ये आयोजित परीक्षेसाठी गुरुकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रांजणगाव आणि पद्मावती कला महाविद्यालय, आमदाबाद, कन्नड या दोन परीक्षाकेंद्रांचा समावेश होता. दिनांक ०२/०४/२०२४ पासून परीक्षांना सुरुवात झाली होती.

गुरुकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रांजणगाव या परीक्षा केंद्रावर दिनांक ०८/०४/२०२४ रोजी बी.एस्सी. (संगणकशास्त्र), बी.एस्सी. (आय.टी.) व बी.सी.ए. (सायन्स) या अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका अनेकांच्या मोबाईलवर आढळणे, केंद्र प्रमुखाने प्रश्नपत्रिका परीक्षाकेंद्राबाहेर पाठविणे, तसेच, संस्थाचालकांनी प्रश्नपत्रिका मागणीबाबतचे व्हॉटस्ॲप चॅट केंद्र प्रमुखाच्या मोबाईलवर आढळून आले होते. तर, पद्मावती कला महाविद्यालय, आमदाबाद, कन्नड या परीक्षाकेंद्रावर दिनांक ०८/०४/२०२४ रोजी बी.एस्सी. (संगणकशास्त्र), या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका कर्मचाऱ्यांच्या मोबाईलवर आढळून आली होती.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन विद्यापीठांच्या तांत्रिक समितीच्या सदस्यांनी महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन तांत्रिक बाबींचा अहवाल सादर केला, सदर प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४८(५)(क) च्या तरतूदीनुसार विद्यापीठाकडून समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या अहवालातील शिफारशी परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दिनांक १५ एप्रिल, २०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये या दोन्ही महाविद्यालयांना पुढील ०३ वर्षांपर्यंत कोणत्याही परीक्षेसाठी परीक्षा केंद्र देण्यात येऊ नये तसेच, या महाविद्यालयांतील प्राचार्य व प्राध्यापकांना पुढील ५ वर्षांकरीता परीक्षेच्या कामापासून प्रतिबंधित करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक ०८/०४/२०२४ व दिनांक १०/०४/२०२४ रोजी घेण्यात आलेल्या बी.एस्सी.

(संगणकशास्त्र), बी.एस्सी. (आय.टी.) व बी.सी.ए. (सायन्स) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा रद्द करुन दिनांक ३०/०४/२०२४ व दिनांक ०२/०५/२०२४ रोजी पुन्हा घेण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ४० पदांचा कार्यभार केवळ ११ प्राध्यापकांवर सोपविला असल्याबाबत

**(४) * २२९९५ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २०० हून अधिक प्राध्यापक कार्यरत असताना विद्यापीठातील विविध विभागातील संचालक, विभाग प्रमुख व समन्वयक इत्यादी महत्वाच्या ४० पदांचा कार्यभार केवळ ११ प्राध्यापकांवर सोपविलेला असून त्यातील ४ प्राध्यापकांकडे ५ पेक्षा जास्त पदांची जबाबदारी सोपविल्यामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका प्राध्यापकाकडे एकापेक्षा जास्त पदांचा कार्यभार सोपविण्यात आल्यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होत असल्याने ते विद्यापीठाच्या प्रगतीला घातक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठातील प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी झालेले सत्तेचे केंद्रीकरण थांबवून विद्यापीठातील प्रत्येक शैक्षणिक विभाग व केंद्राच्या प्रमुख पदावर जास्तीत जास्त एका प्राध्यापकास पूर्णवेळ पद द्यावे, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सत्तेचे केंद्रीकरण थांबविण्यासाठी व अधिसभा सदस्यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने व विद्यापीठातील प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) दिनांक २३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या अधिसभेच्या सभेमध्ये याबाबतचा प्रश्न मांडण्यात आला होता.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील अन्न सुरक्षा योजनेतंर्गतच्या लाभार्थ्यांना शासनाकडून लाभ मिळत नसल्याबाबत

**(५) * २३९१० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील अन्न सुरक्षा योजनेमधील ८ हजार, ७०० शेतकरी लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळत नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १४ जिल्हयांमध्ये केशरी रेशन कार्डधारकांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या शिधावाटप केंद्रामध्ये दुकानदारांना लाभार्थ्यांचे अर्ज भरण्याबाबत नोटीस देण्यात येवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना लाभ मिळण्याबाबत तसेच लाभार्थ्यांचे अर्ज न भरणाऱ्या शिधावाटप केंद्रातील दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे.
(२) दिनांक २८/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, बीड, धाराशीव, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी रुपये १५०/- इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरणाची (Direct Benefit Transfer-DBT) योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विरार – अलिबाग कॉरीडॉरच्या रस्त्यांसाठी भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच निविदा काढण्यात आल्याबाबत

**(६) * २२९१५ श्री.विलास पोतनीस, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोणतेही रस्ते, पूल, रोपवे यांचे बांधकाम भूसंपादन पूर्ण होऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावे सातबारा झाल्याशिवाय, उक्त बांधकाम केल्यास संबंधित अधिकाऱ्यांची कोणतीही चौकशी न करता निलंबित करण्यात येईल अथवा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असा दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील आदेशाचे सार्वजनिक बांधकाम विभागाने उल्लंघन केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विरार – अलिबाग कॉरीडॉरसाठी केवळ ५ टक्के जमिनीचे भूसंपादन झाले तर पुणे रिंग रोडचे ५० टक्केच भूसंपादन झाले असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने विरार – अलिबाग कॉरीडॉरच्या पहिल्या टप्प्यातील नवघर ते चिरनेर या ९६ कि.मी. लांबीच्या मार्गाच्या अकरा पॅकेजच्या उभारणीसाठी १९ हजार ३३४ कोटी रुपयांच्या निविदा काढल्या असून त्या दिनांक १८ एप्रिल, २०२४ रोजी खुल्या करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कॉरीडॉरसाठी भूसंपादन पूर्ण प्रक्रिया होवून जमिनींचा सातबारा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावे झाल्याशिवाय काम सुरू करू नये, असे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी काढले असून, उक्त रस्त्यांसाठी भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच निविदा काढून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर आदेशाचे उल्लंघन केले असल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विरार – अलिबाग कॉरीडॉरच्या रस्त्यांसाठी भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच निविदा काढून आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खाक्षेस-२०२३/प्र.क्र.४४८/रस्ते-८, दिनांक ३०/११/२३ च्या पत्रान्वये विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाकरीता विशेष बाब म्हणून शासनाच्या दिनांक २९/०८/२०१६ रोजीच्या परिपत्रकातील १०० टक्के भूसंपादनाच्या अटीस शिथीलता देण्यात आली असून त्यानुसार RFP निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदारास स्विकृती पत्र (Letter of Acceptance) देण्यापूर्वी ७० % भूसंपादन झाले असणे आवश्यक आहे. त्यानुसार RFP निविदा प्रक्रिया राबवण्यात येत आहे व त्यासोबतच भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खाक्षेस-२०२३/प्र.क्र.४४८/रस्ते-८, दिनांक ३०/११/२३ च्या पत्रान्वये विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाकरीता विशेष बाब म्हणून शासनाच्या दिनांक २९/०८/२०१६ रोजीच्या परिपत्रकातील १०० टक्के भूसंपादनाच्या अटीस शिथीलता देण्यात आली असून त्यानुसार RFP निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदारास स्विकृती पत्र (Letter of Acceptance) देण्यापूर्वी ७०% भूसंपादन झाले असणे आवश्यक आहे. त्यानुसार RFP निविदा प्रक्रिया राबवण्यात येत आहे व त्यासोबतच भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणे जिल्ह्यातील बहुतांश औषध विक्री दुकानांमध्ये नोंदणीकृत औषध विक्रेता उपस्थित नसल्याबाबत

**(७) * २३६१६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नवीन नियमानुसार औषध विक्री दुकानांमध्ये नोंदणीकृत औषध विक्रेता (फार्मासिस्ट) असणे कायदयाने बंधनकारक असतानाही मुंबईसह ठाणे जिल्ह्यातील जवळपास २०० हून अधिक दुकानांमध्ये औषध विक्रेता (फार्मासिस्ट) नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेल्या औषध विक्री दुकान मालकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ च्या नियम ६४ नुसार किरकोळ औषध विक्री दुकानास परवाने मंजूर करण्यापूर्वी रजिस्टर्ड फार्मासीस्टची नेमणूक करण्याची अट आहे. त्यानुसार, औषध विक्री परवाने मंजूर करण्यापूर्वी दुकानांमध्ये रजिस्टर्ड फार्मासीस्ट असल्याबाबतची पडताळणी करूनच किरकोळ औषध विक्री परवाने मंजूर करण्यात येतात.

दिनांक ०६/०१/२०२४ च्या ‘दै. लोकसत्ता’ वर्तमानपत्रात मुंबई, ठाण्यामध्ये २०० औषध दुकानात फार्मासीस्ट यांची अन्न व औषध प्रशासनाकडे नोंद नसल्याबाबत बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाकडून मुंबई व ठाण्यात XLN ऑनलाईन प्रणालीमध्ये आढळून आलेल्या विना रजिस्टर्ड फार्मासीस्ट पेढयांची संबंधित क्षेत्रिय औषध निरीक्षकांमार्फत पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणीमध्ये बहुतांश पेढया या बंद झाले असल्याचे निदर्शनास आले. तथापि, सदर परवानाधारकांनी त्यांचे परवाने ऑनलाईन प्रत्यार्पित केले नसल्यामुळे व काही पेढयांनी त्यांच्याकडील रजिस्टर्ड फार्मासीस्टची नोंद संगणकीय प्रणालीत केली नसल्यामुळे संगणकीय प्रणालीत सदर पेढया विना रजिस्टर्ड फार्मासीस्ट असल्याचे दिसून आले. उक्त प्रकरणी औषध निरीक्षकांनी सादर केल्यानुसार बंद झालेल्या पेढयांचे परवाने ऑनलाईन प्रणालीत रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे. तसेच, रजिस्टर्ड फार्मासीस्टची संगणकीय प्रणालीत नोंद न घेतलेल्या पेढयांना रजिस्टर्ड फार्मासीस्टच्या नेमणुकीची नोंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील खाजगी शाळांनी शैक्षणिक वर्षाच्या शुल्कात वाढ केली असल्याबाबत

**(८) * २३१२० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खाजगी शाळांनी गतवर्षीच्या तुलनेत नवीन वर्षात १० ते १५ टक्क्यांनी शुल्क वाढ केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी शाळांच्या शुल्कवाढीच्या नियंत्रणाबाबत करावयाच्या सुधारणेसंदर्भात अद्यापही निर्णय झाला नसून यासाठी दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली ९ जणांची समिती गठीत केली असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने ३ महिन्यांच्या कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करणे अपेक्षित असतानाही प्रत्यक्ष ३ वर्षे होऊनही अद्यापपर्यंत समितीचा अहवाल शासनास सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाळा शुल्क सुधारणा कायद्याबाबतची रचना योग्यरीतीने झाली नसून शाळा शुल्क सुधारणा कायद्याला ७ वर्षांहून अधिक काळ होऊनही शाळांकडून शुल्क कायद्याचा आधार घेत दर २ वर्षांनी १५% शुल्क वाढ केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळांतील शालेय शुल्कावर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच मुंबईतील खाजगी शाळांकडून होत असणारी मनमानी शुल्कवाढ थांबविण्यासाठी शुल्कवाढीच्या नियंत्रणाबांबतच्या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) समितीचा अहवाल प्राप्त झालेला असून शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा अधिनियम), २०१८ अन्वये राज्यातील खाजगी व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षक-पालक संघ यांच्या मान्यतेने शैक्षणिक शुल्कामध्ये दर दोन वर्षानी वाढ करण्याबाबत तरतूद आहे.
(५) समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने अधिनियमातील व नियमांतील तरतुदींचा आढावा घेऊन त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पालकांचे उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत

**(९) * २३३०१ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील आर्थिक परिस्थितीमुळे शालेय शुल्क भरु न शकणाऱ्या एका गरीब विद्यार्थीनीने माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आल्यावर शासनाने ८ लाख रुपयांच्या आत पालकांचे उत्पन्न असणाऱ्या व उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना माहे जून, २०२४ पासून कोणतेही शैक्षणिक शुल्क भरावे लागणार नसल्याची घोषणा माहे फेब्रुवारी,२०२४ मध्ये मा.उच्च व तंत्र शिक्षण महोदयांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयाच्या धर्तीवर, मुलींप्रमाणेच ८ लाख रुपयांच्या आत उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांनादेखील (शालेय विद्यार्थ्यांस) शैक्षणिक शुल्क माफी लागू करण्यात यावी अशी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ फेब्रुवारी,२०२४ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुले आणि मुलीं (विद्यार्थी) असा भेदभाव न करता, ज्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षण घेता येत नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना शुल्कमाफी देण्यात यावी अशीही मागणी विद्यार्थी- पालकवर्गांकडून त्याच दरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ८ लाख रुपयांच्या आत पालकांचे उत्पन्न असणाऱ्या व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना शैक्षणिक शुल्क माफी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मुलां-मुलींना शुल्क माफी करावी, अशी लोकप्रतिनिधींकडून मागणी प्राप्त झाली आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शालेय शिक्षकांना गणवेश सक्ती करण्यात आल्याबाबत

**(१०) * २२८९४ श्री.सत्यजीत तांबे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षकांचा पेहराव कसा असावा यासाठी शालेय शिक्षण विभागाने माहे मार्च, २०२४ मध्ये मार्गदर्शक सूचना जारी करून शिक्षकांना गणवेश सक्तीचे केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारची गणवेश सक्ती शिक्षकांच्या अभिव्यक्ती तसेच जगण्याच्या अधिकारावर गदा आणणारी असल्याचा आरोप करून राज्यातील काही शिक्षक संघटनांनी शिक्षकांच्या गणवेशाला विरोध नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम, जिल्हा परिषद सेवा शर्ती, माध्यमिक शाळा संहिता यात गणवेशाबाबत तरतूद नसल्यामुळे ही सक्ती शिथिल करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आजही ग्रामीण भागात ज्येष्ठ शिक्षक धोतर- पायजमा वापरत असून सदरच्या मार्गदर्शक सूचनांमुळे त्यांच्या अधिकारांवर गदा येणार असून, यापूर्वीही तीन वेळा शालेय शिक्षण विभागाने शिक्षकांना गणवेशाची सक्ती केली होती, परंतु त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम, जिल्हा परिषद सेवा शर्ती, माध्यमिक शाळा संहिता यात गणवेशाबाबत तरतूद नसल्यामुळे गणवेश सक्ती शिथिल करण्याबाबत

शिक्षक संघटनांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) राज्यातील सर्व शिक्षकांकरीता दैनंदिन पेहराव कशा पध्दतीचा असावा याबाबतच्या मार्गदर्शक सूचना शासन परिपत्रक दिनांक १५/०३/२०२४ अन्वये करण्यात आलेल्या आहेत.
(२) व (३) हे खरे आहे. याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) शिक्षकांकडे मार्गदर्शक व गुरु म्हणून पाहीले जाते. ते भावी पिढी घडवीत असतात. तसेच विद्यार्थी अनुकरणप्रिय असल्याकारणाने शिक्षकांच्या पेहरावाचा परिणाम हा विद्यार्थी यांचे व्यक्तिमत्वावर व अध्ययनावर होत असतो, ही बाब विचारात घेऊन, शिक्षकाचा पेहराव कसा असावा याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. याकरीता माध्यमिक शाळा संहिता व सेवा शर्तीमध्ये तरतूद करण्याची आवश्यकता नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आद्य क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचा जीवन प्रवास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करणेबाबत

**(११) * २३७९६ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी जननायक आद्यक्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचा जीवन प्रवास शालेय शिक्षणात अंतर्भूत करावा, अशी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी सन २०२२ मध्ये केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन प्रवासाचा भाग अभ्यासक्रमात समावेश करण्यासंदर्भात मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी तत्सम विभागास उचित कार्यवाही करण्याचे निर्देशीत केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आद्यक्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचा जीवन प्रवास यावर्षापासून शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रचलित अभ्यासक्रमानुसार बिरसा मुंडा यांच्या जीवनावर आधारित आशयाचा समावेश पाठ्यपुस्तकांमध्ये करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य अभ्यासक्रम आराखडा विकसनाची प्रक्रिया सुरु असून त्यावर आधारित शालेय शिक्षणाच्या नवीन अभ्यासक्रमाची रचना करताना शालेय

अभ्यासक्रमात बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्राचा समावेश करण्याबाबतची योग्य ती कार्यवाही राज्य अभ्यासक्रम आराखडा व राज्य अभ्यासक्रम निर्मिती समितीच्या निर्णयानुसार करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१२) * २३५८६ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारक उभारणीसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ट असून आंतरराष्ट्रीय शिवस्मारक प्रकल्पाचे काम ९ वर्षे होऊनही अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्मारकाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व स्मारकाचे काम अद्यापही अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या ०२ विशेष अनुमती याचिका व तद्नंतर दाखल झालेली ०१ रीट याचिका या तिन्ही याचिकांच्या दिनांक ०३/०३/२०२० रोजीच्या एकत्रीत सुनावणींनंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका निकाली काढल्या व रिट याचिका सुनावणीसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल मूळ जनहित याचिकांसोबत (PIL ५८/२०१७ व PIL ०८/२०१८) चालविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार या सर्व याचिकांचे प्रतिवादी यांच्यातर्फे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिज्ञापत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले असून इतर प्रतिवादींची प्रतिज्ञापत्रेही मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात येत आहेत. मा.न्यायालयाने सुनावणीची तारीख अद्याप जारी केलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या मिळणेबाबत

**(१३) * २३०७८ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या वितरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) याबाबत क्षेत्रिय स्तरावर विशेष कार्यशाळा घेण्याबाबत आयुक्त (शिक्षण), पुणे व संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार संयुक्त शाळांची निर्मिती करण्यात येणार असल्याबाबत

**(१४) * २३३२३ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार शिक्षण क्षेत्रात नव्याने वेगवेगळे बदल करण्यात येत असून त्यानुसार राज्यात इयता पहिली ते आठवी, पहिली ते दहावी, पहिली ते बारावी अशा संयुक्त शाळांची निर्मिती करण्यात येणार असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व प्राथमिक शाळांना आठवीपर्यंतचे आणि माध्यमिक शाळांचे वर्ग जोडण्यात येत असताना वर्गनिहाय शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी शासन उपलब्ध करून देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायद्यातील तरतुदीनुसार शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ करताना बालकांच्या घरापासून एक किलोमीटर अंतराच्या आत प्राथमिक शाळा व तीन किलोमीटर अंतराच्या आत उच्च प्राथमिक शाळांसाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याने या सर्व शाळांसाठी एक ते तीन किलोमीटरच्या आतील बृहत आराखडा शासनाने तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बृहत आराखड्यानुसार इयता पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षणाचे नियोजन करताना अंगणवाडी ते पहिली पर्यंतच्या शाळांचेही नियोजन करण्याची आवश्यकता असल्याने त्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ नुसार जिल्हानिहाय मंजूर पायाभूत पदांच्या मर्यादेत संबंधित जिल्ह्यातील सुयोग्य इ.१ ली ते इ.४ थी च्या शाळेस इ.५वी चा वर्ग व आवश्यकतेनुसार उच्च प्राथमिक व माध्यमिक वर्ग जोडण्यास तसेच इ.१ ली ते इ.७ वी च्या शाळेस इ.८ वी चा वर्ग व आवश्यकतेनुसार माध्यमिकचे वर्ग जोडण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/ आयुक्त महानगरपालिका यांना प्रदान करण्यात आले आहेत. सदर वर्गांवर मंजूर पायाभूत पदांच्या मर्यादेत समायोजनाव्दारे शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

(३) उक्त शासन निर्णयामुळे कोणतीही शाळा बंद अथवा स्थलांतरीत करण्यात येणार नसल्यामुळे वाहतुकीची सुविधा नव्याने उपलब्ध करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा बाजार समितीने बोगस कांदा अनुदान प्रस्ताव तयार करून कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१५) * २३५०३ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा बाजार समितीच्या सचिवांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक यांनी दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीगोंदा बाजार समितीने शेकडो शेतकऱ्यांच्या नावे बोगस कांदा अनुदान प्रस्ताव तयार करून शासनाची कोटयवधी रुपयांची फसवणूक केली असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्रीगोंदा बाजार समितीने बोगस कांदा अनुदान प्रस्ताव तयार करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) व (४) श्री.टिळक भोस यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती श्रीगोंदा येथे कांदा अनुदान योजना सन २०२२-२३ मध्ये बोगस अनुदान लाटण्याचे प्रकार झाले असल्याबाबत तक्रार केली होती. यासंदर्भात चौकशीसाठी श्री.आर.एफ. निकम, जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१ सहकारी संस्था, अहमदनगर व श्री.एस.एन. खर्डे, विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ (पणन), सहकारी संस्था, अहमदनगर यांचे संयुक्त पथक नियुक्त केले असून त्यांनी दिनांक ०६/०३/२०२४ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालातील निष्कर्ष विचारात घेऊन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्या दिनांक २२/०३/२०२४ च्या पत्रान्वये चौकशी अहवालात नमूद कर्मचारी व व्यक्ती यांच्याविरुध्द फौजदारी कारवाई करणेबाबत

सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा यांना निर्देश देण्यात आले. तदनंतर जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-२, सहकारी संस्था, अहमदनगर यांना नमूद व्यक्तींविरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक १२/०४/२०२४ रोजी निर्देश देण्यात आले असून त्यानुसार कांदा अनुदान योजनेतील निधीच्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने १६ व्यक्तींविरुध्द पोलीस स्टेशन, श्रीगोंदा येथे दिनांक २२/०४/२०२४ रोजी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक-५६७/२०२४, भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत दाखल केला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

## मुंबईत विनापरवाना बर्फ विक्री करणाऱ्या तसेच दूषित बर्फ विकणाऱ्या बर्फ उत्पादकांवर कारवाई करण्याबाबत

**(१६) * २२९२१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न सुरक्षा नियमानुसार खाद्य बर्फ विक्रेत्यांनी परवाना घेणे बंधनकारक असतानाही मुंबईतील काही बर्फ उत्पादक विनापरवाना व्यवसाय करित असल्याचे दिनांक ६ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बर्फ उत्पादकाने खाण्यायोग्य नसलेल्या बर्फात निळा रंग वापरणे बंधनकारक असून, दूषित बर्फात ई-कोलाय या मानवी शरीरास घातक असलेल्या विषाणूचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तपासणी करण्यासाठी शासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे काय, तपासणी मोहिमेत काय आढळून आले आहे तसेच मुंबईत विनापरवाना बर्फ विक्री करणाऱ्या व दूषित बर्फ विकणाऱ्या बर्फ उत्पादकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील बर्फ उत्पादक विनापरवाना व्यवसाय करत असल्याचे दिनांक ६ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ३१/०३/२०१८ रोजीच्या अधिसूचनेमध्ये बर्फ उत्पादकाने खाण्यायोग्य नसलेल्या बर्फात निळा रंग वापरणे बंधनकारक असल्याची तरतूद करण्यात आली आहे.

दूषित बर्फात ई-कोलाय या मानवी शरीराला घातक असलेल्या विषाणूचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई विभागाद्वारे बर्फ या अन्न पदार्थाचे नमुने घेण्याची विशेष मोहीम माहे मे, २०२४ मध्ये राबविण्यात आली आहे. सदर मोहिमेंतर्गत दोन उत्पादक पेढ्यांची तपासणी करून प्रत्येक पेढीतून ०१ असे एकूण ०२ सर्वेक्षण नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. सदरचे अन्न नमुने

प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून नमुन्यांचा विश्लेषण अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कौशल्य विकास संस्था उभारणीस विलंब होत असल्याबाबत

**(१७) * २३०३७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १८८३१ ला दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदयामध्ये त्या-त्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शाखेची स्थापना करण्याची तरतुद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगरच्या कार्यक्षेत्रात छत्रपती संभाजीनगर येथे २५ एकर जमीन, घनसावंगी येथे १० एकर जमीन, अंबेजोगाई येथे २५ एकर जमीन, धाराशिव येथे ६० एकर जमीन तसेच जालना येथे २५ एकर जमीन असूनही विद्यापीठाने अद्याप त्या-त्या ठिकाणी रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरु केले नसल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठांतर्गत कौशल्य केंद्र उभारणीसाठी २५ कोटी रुपयांचा निधी मिळणेसाठी विद्यापीठ प्रशासनाने शासनाकडे प्रस्ताव दिला असून शासनाने निधी उपलब्ध करुन दिल्यास विद्यापीठातंर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाचे शिक्षण घेवून रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यापीठाने दाखल केलेल्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच उक्त अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय.
(२) होय, अंशत: खरे आहे.
(३) होय, खरे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी सदर विद्यापीठांतर्गत जालना येथे कौशल्य विकास संस्था स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव इमारतीचे नकाशे व अंदाजपत्रकासह कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता विभागास सादर केला आहे.
(४) निरंक.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील बनावट शिक्षक भरती प्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(१८) * २३४५९ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील ६ शाळा/महाविद्यालयांतील बनावट नियुक्ती, बोगस वैयक्तीक मान्यता व शालार्थ आयडी मिळवून देऊन वेतन अदा करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा नियुक्तीमध्येही सेवाज्येष्ठ उमेदवाराला डावलून कनिष्ठ उमेदवाराची नियुक्ती केली असून शिक्षणाधिकारी कार्यालयाने नियमबाह्य नियुक्तीस वैयक्तीक मान्यता व अनुकंपा प्रकरणातील नियुक्तीस मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भंडारा जिल्ह्यातील शाळा/महाविद्यालयांतील बनावट नियुक्ती, बोगस वैयक्तीक मान्यता व शालार्थ आयडी प्रकरणे यासह जिल्ह्यातील अनेक नियुक्त्यांमध्ये अनियमितता करणाऱ्या संबंधित विभागातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील शाळेतील बनावट नियुक्ती, बनावट वैयक्तिक मान्यतेचा आधारे शालार्थ आयडी मिळविण्यासाठी ६ प्रस्ताव शिक्षण उपसंचालक, नागपूर कार्यालयास प्राप्त झाले होते. त्यापैकी ५ प्रकरणात शालार्थ आयडीचे आदेश देण्यात आले होते. सदर प्रकरणी केलेल्या चौकशीत वैयक्तिक मान्यतेचे आदेश व शालार्थ संबंधित प्रस्तावावर तत्कालिन शिक्षणाधिकारी यांची बनावट स्वाक्षरी असल्याचे निदर्शनास आल्याने सदर वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी रद्द करण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणात वेतन अदा करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केंधळी (ता.मंठा, जि.जालना) येथील नदीवरील धोकादायक पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) * २३८८३ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंधळी (ता.मंठा जि.जालना) येथील नदीवरील पूल धोकादायक झाला असून, सदर पुलावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच या पुलाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर पूल धोकादायक नसून पोलीस विभागाच्या अहवालावरुन माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये पूलाच्या भागामध्ये धावत्या बसने उभ्या असलेल्या कंटेनरला मागुन धडक देऊन अपघात झाला होता व त्या बसमधील प्रवाशी किरकोळ जखमी झाले होते. तेव्हापासून आजतागायत केंधळी पूलावर अपघात झाल्याबाबतची नोंद नाही.
(२) व (३) केंधळी येथील मोठापूल (लांबी ८१ मीटर) साखळी क्रमांक किमी ४/६२० वर अस्तित्वात आहे. सद्यास्थितीत राष्ट्रीय महामार्ग ७५२-आय वर वाटूर ते चारठाणा साखळी क्रमांक किमी ०/०० ते किमी २७/०० या रस्त्याच्या उन्नतीकरण्याच्या कामांतर्गत सदर पूलाची पूर्वीची १२ मीटर रुंदी वाढवून १८ मीटर करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीबाबत

**(२०) * २२९४० श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० ची अंमलबजावणी करण्याचे शासनाने निश्चित केले असून माहे जून, २०२४ पासून शैक्षणिक वर्षात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० राबविण्यात येणार असून या धोरणाची अंमलबजावणी न करणाऱ्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशारा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी दिला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये अंगणवाडी ते पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणे, त्यांना सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क कमी करणे, पुरेशे शिक्षक देणे, आणि शिक्षकांना ही इतर शैक्षणिक कामे न देणे आदी बाबींचा विचार या धोरणात करण्यात आला असून सदर धोरणाच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठ पातळीवर अद्याप समिती स्थापन केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन सदर समिती स्थापन करणेबाबत तसेच शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणींबाबत कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत समिती कार्यरत असून वेगवेगळ्या घटकांसोबत सातत्याने संवाद साधून सहविचाराने सभेच्या माध्यमातून कामकाज चालू आहे. (संपर्क अभियान व सहविचार कार्यशाळा), स्कुल कनेक्ट कार्यक्रमाची अंमबजावणी सुरु आहे, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० उद्बोधन कार्यशाळा, प्राचार्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे.

(३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार सर्व विद्यापीठांनी तसेच संलग्नित महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर एनईपी सेल स्थापन करावयाच्या सूचना प्र-कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे महाराष्ट्र राज्य आणि सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य यांना उच्च शिक्षण संचालनालयाच्या दिनांक ३० एप्रिल, २०२४ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील शाळांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत धान्य पुरविण्यात येत नसल्याबाबत

**(२१) * २३३२७ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत तांदूळ व धान्यादी माल शाळांना पुरविण्यात येत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत इयता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दररोज देण्यात येणाऱ्या पोषण आहाराबाबतची दैनंदिन माहिती अद्ययावत केली जात नसल्याने ४० टक्क्यांपेक्षा अधिक शाळांमध्ये पोषण आहांराचे वाटप होत नसल्याचे पोर्टलवरील आकडेवारीवरून माहे मार्च, २०२४ च्या अखेरीस निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शाळा विद्यार्थ्यांना नियमित जेवण देतात मात्र पोर्टलवर आकडेवारी भरण्याबाबत विलंब करित असल्याने ८५,१०६ शाळांपैकी केवळ ६२,१४८ शाळांनी आहार वाटप केल्याची माहिती माहे मार्च, २०२४ अखेरीस भरल्याने केंद्र शासनाच्या आदेशावरून शिक्षण संचालनालयाने सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना याबाबत पडताळणी करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई तसेच गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील सर्वाधिक शाळा पोषण आहाराबाबत पोर्टलवर अद्यायवत माहिती देत नाहीत तसेच कुडाळ तालुक्यातील शाळांनी दिनांक ८ जानेवारी, २०२४ रोजी माहे फेब्रुवारी ते एप्रिल २०२४ पर्यंतची धान्याची मागणी नोंदवूनही अद्यापपर्यंत हे धान्य पुरविण्यात न आल्याने मुख्याध्यापकांना पदरमोड करून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना राबवावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोर्टलवर माहिती वेळेत अद्ययावत करणे तसेच कुडाळ तालुक्यातील शाळांना मुख्याध्यापकांनी व शाळा नियंत्रण समितीने मागणी केलेले सदर योजनेतील धान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पात्र असलेल्या २६१ शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना विहित कालावधीत पोषण आहाराचा लाभ दिलेला आहे.
(२) हे खरे नाही.

सदर योजनेस पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नियमितपणे पोषण आहाराचा लाभ देण्यात येत आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील बहुतांशी शाळा ऑनलाईन माहिती अद्यायावत करतात. तसेच, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विविध प्रकारच्या तांत्रिक अडचणींमुळे प्रत्यक्षात आहार वितरीत करण्यात येवून देखील एम.डी.एम. पोर्टलवर नोंद करण्यास विलंब होतो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील कुडाळ तालुक्यातील सर्व शाळांना तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला आहे.
(५) सदर विषयाच्या अनुषंगाने प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन जिल्ह्यातील व तालुक्यातील संबंधित अधिकारी तसेच, कर्मचाऱ्यांना एमडीएम पोर्टलवर सदर योजनेची माहिती भरण्याबाबत ऑनलाईन कार्यशाळा घेवून मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यातील १०० टक्के शाळा नियमितपणे उपस्थितीची नोंद करतील याकरीता आवश्यक ते नियोजन जिल्हास्तरावरुन करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मेळघाटसह अन्य आदिवासी वाड्या-वस्त्यांवरील मजूरांच्या स्थलांतरामुळे शेकडो मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्याबाबत

**(२२) * २२९८६ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट, चिखलदरा व धारणी (जि.अमरावती) येथील आदिवासी वाड्या-वस्त्यांवरील आदिवासी कुटुंबांनी शहराकडे वीटभट्ट्यांवर रोजगारासाठी स्थलांतर केले असून या स्थलांतरामुळे आदिवासी कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय संविधानात देशातील प्रत्येकाला प्राथमिक शिक्षण मोफत मिळावे अशी तरतूद असल्याने देशातील प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्यासाठी शिक्षण हक्क कायदा, २००९ संसदेत पारित करण्यात आला असूनही राज्यातील स्थलांतरित कामगारांची मुले मोठ्या प्रमाणात शिक्षणापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेळघाटसह राज्यातील मजूरांच्या स्थलांतरामुळे शेकडो मुले दरवर्षी शिक्षणापासून वंचित राहत असून त्यांचा शिक्षणाचा आणि आरोग्याचा प्रश्न जटिल बनला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीटभट्टीवरील कामगारांच्या मुलांचा शोध घेऊन जवळच्या प्राथमिक शाळेत प्रवेश देऊन सामावून घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक शिक्षकांना देण्याबाबत व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अमरावती यांच्या दिनांक २१/१२/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन अमरावती जिल्ह्यातील स्थलांतर होणाऱ्या पालकांचे सर्वेक्षण केले असता, एकूण ५३ विद्यार्थी पालकांसोबत स्थलांतरीत झाल्याचे आढळून आले आहेत. यामध्ये धारणी तालुक्यातील एकही विद्यार्थी वीटभट्टी परिसरात स्थलांतरीत झालेला नाही व चिखलदरा तालुक्यातील १३ विद्यार्थी व अचलपूर, चांदुरबाजार, चांदुर रेल्वे, धामनगाव रेल्वे, नांदम खंडेश्वर, आणि अंजनगाव सुर्जी या तालुक्यातील १६ व यवतमाळ जिल्ह्यातील १ असे एकूण ३० विद्यार्थी तसेच मध्यप्रदेश राज्यातील बैतुल, छिंदवाडा, खरगोन या जिल्ह्यातील २३ असे एकूण ५३ विद्यार्थी पालकांसोबत स्थलांतरीत झाल्याचे आढळून आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) अमरावती जिल्ह्यातील पालकांसोबत स्थलांतरीत झालेल्या ५३ विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.